www.attalmat.com

# अट्टलमत

RNI.No. MAHMAR/2007/21199

छत्रपती संभाजीनगर | वर्ष २० | अंक २ | सोमवार दि. १४ सप्टेंबर २०२६ | पाने ४ | किंमत २ रू.

## पंतप्रधान मोदींनी देशात 'पॉलिटिक्स फॉर परफॉर्मन्स' रुजवले - केंद्रीय गृहमंत्री अमित शाह

### मोदींच्या २५ वर्षांच्या सार्वजनिक सेवेच्या निमित्ताने १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबरदरम्यान देशभर 'सेवा संकल्प अभियान'

मुंबई : भ्रष्टाचार, जातिवाद आणि घराणेशाहीच्या राजकारणातून देशाला बाहेर काढत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गेल्या १२ वर्षांत 'पॉलिटिक्स ऑफ परफॉर्मन्स'ची नवी दिशा दिली आहे. राष्ट्रवाद आणि 'भारत प्रथम' ही धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे बनली असून, सरकारच्या कामगिरीचे मूल्यमापन आता परिणाम, उपलब्धी आणि जनतेपर्यंत पोहोचणाऱ्या योजनांच्या आधारे होऊ लागले आहे, असे प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी रविवारी केले. नरेंद्र मोदी यांच्या मुख्यमंत्री आणि पंतप्रधान म्हणून २५ वर्षांच्या सार्वजनिक सेवेच्या निमित्ताने १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबरदरम्यान देशभर राबविण्यात येणाऱ्या 'सेवा संकल्प अभियाना'ची माहिती देण्यासाठी आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे, प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण आणि मंत्री आशिष शेलार यावेळी उपस्थित होते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा १७ सप्टेंबरला जन्मदिन असून, ७ ऑक्टोबर २०२६ रोजी त्यांच्या मुख्यमंत्री आणि पंतप्रधानपदाच्या सार्वजनिक कारकीर्दीला २५ वर्षे पूर्ण होत आहेत. गुजरात राज्याचे मुख्यमंत्री आणि देशाचे पंतप्रधान म्हणून सलग २५ वर्षे जनसेवेचा विक्रम नोंदविणारे फार कमी नेते आहेत. वारंवार निवडणुकीच्या कसोटीवर उतरून जनतेचा विश्वास संपादन करणे आणि राज्य तसेच राष्ट्राच्या कल्याणाचे कार्य सातत्याने सुरू ठेवणे ही मोठी उपलब्धी असल्याचे शाह यांनी सांगितले. यापूर्वी गुजरातमध्ये आणि त्यानंतर देशभरात १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबरदरम्यान 'सेवा सप्ताह' आयोजित केला जात होता. मात्र, यंदा २५ वर्षांच्या सार्वजनिक सेवेच्या निमित्ताने हा उपक्रम महिनाभर चालविण्याचा निर्णय भाजप, मित्रपक्ष आणि विविध स्वयंसेवी संघटनांनी घेतला आहे.



हे अभियान सर्व राज्ये, केंद्रशासित प्रदेश, जिल्हे, लोकसभा आणि विधानसभा मतदारसंघांपासून बूथ स्तरापर्यंत राबविण्यात येणार आहे. 'जन सेवा ही प्रभु सेवा' हे या अभियानाचे सूत्र असून, जनभागीदारीच्या माध्यमातून २०४७ मध्ये विकसित भारताची निर्मिती करणे हे त्याचे उद्दिष्ट आहे. सेवा हा संस्कार बनविणे आणि संघटनेला जनभागीदारीच्या माध्यमातून जनकल्याणाचे साधन बनविणे, या दोन उद्देशांनी अभियानाची आखणी करण्यात आली आहे. गुरु नानकदेव यांच्या सेवेच्या संदेशाचा आणि समर्थ रामदास स्वामींच्या 'उपभोगशून्य स्वामी' या विचाराचा संदर्भ देत मोदी यांनी सेवा आणि शासनाचा हा संस्कार जनतेसमोर मांडल्याचे शाह यांनी सांगितले.(Union Home Minister Amit Shah)

अभियानात देशभरात १२ प्रमुख कार्यक्रम राबविण्यात येणार आहेत. 'सेवा दिवस' या उपक्रमात रक्तदान, दीपप्रज्वलन आणि मोदी यांच्यावर २५ वर्षे विश्वास व्यक्त करणाऱ्या जनतेप्रती कृतज्ञता व्यक्त केली जाणार आहे. 'मेरे सपनों का भारत' या उपक्रमात मुले, किशोर आणि युवकांसाठी चित्रकला व भाषण स्पर्धा होतील. 'नमो सेवा की अनकही कहानियां'च्या माध्यमातून स्थानिक भाषांमध्ये संगीतमय नाट्यप्रयोग गावागावांत नेले जातील. 'आंगन मिलन सेवा'मध्ये अंगणवाडी कर्मचाऱ्यांचा सन्मान आणि मातृसंवाद होईल. गेल्या २५ वर्षांत सरकारी योजनांमुळे ज्यांच्या जीवनात बदल झाला, अशा लाभार्थ्यांशी संवाद साधून त्यांचे अनुभव 'सेवा की कहानी' या उपक्रमातून जनतेपर्यंत पोहोचवले जातील.

'सेवा ज्योति कलश यात्रा'च्या माध्यमातून विकसित भारताचा जनसंकल्प घेतला जाणार आहे. 'वडनगर से वाराणसी की सेवा यात्रा'मध्ये दोन्ही दिशांनी युवक मोटारसायकलवरून प्रवास करतील. सात राज्यांतून गावागावांत मुक्काम करीत वडनगरहून निघालेली टीम वाराणसीला आणि वाराणसीहून निघालेली टीम वडनगरला पोहोचेल. 'सेवा मेरा योगदान'अंतर्गत जनभागीदारीतून २५ सेवाभिमुख उपक्रम राबविले जातील. 'सेवा सेतु अभियान'च्या माध्यमातून केंद्र आणि राज्य सरकारच्या योजनांचा लाभ तळागाळातील प्रत्येक पात्र व्यक्तीपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. आधार किंवा रेशनकार्ड नसलेल्या व्यक्तींपासून सरकारी योजनांपासून वंचित असलेल्या नागरिकांपर्यंत प्रशासनाच्या योजना पोहोचविण्याचे काम केले जाईल.

'सेवा के रंग राष्ट्र के संग' या उपक्रमात मोठ्या मानवी समूहाच्या माध्यमातून रंगोळी साकारण्याचा उपक्रम होईल. 'सेवा फर्स्ट इनोव्हेशन चॅलेंज'मध्ये पाच क्षेत्रीय नवोन्मेष स्पर्धा घेण्यात येतील. 'सुशासन सेवा संवाद'अंतर्गत पंचायत ते संसदपर्यंतच्या निवडून आलेल्या प्रतिनिधींचे देशाच्या चार भागांत महाकुंभ आयोजित केले जातील.

## खुलताबाद तालुक्यातील १६ ग्रामपंचायतींच्या पदभारात बदल

### प्रशासकीय कामकाज करण्यासाठी पंचायत समितीचा आदेश; पुढील आदेशापर्यंत अधिकाऱ्यांकडे प्रशासक म्हणून पदभार

खुलताबाद प्रतिनिधी( सतोष करपे).खुलताबाद तालुक्यातील ग्रामपंचायतींच्या प्रशासकीय कामकाजात सुसूत्रता आणण्यासाठी पंचायत समिती प्रशासनाने १६ ग्रामपंचायतींच्या पदभारात बदल केला आहे. संबंधित ग्रामपंचायतींचा पदभार प्रशासकीय कामकाजाच्या सोयीसाठी अन्य ग्रामपंचायत अधिकाऱ्यांकडे पुढील आदेशापर्यंत प्रशासक म्हणून सोपविण्यात आला आहे.

या संदर्भात पंचायत समिती खुलताबादच्या गटविकास अधिकाऱ्यांनी ८ सप्टेंबर २०२६ रोजी एका पत्राद्वारे आदेश जारी केला आहे. या आदेशामागे महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास विभागाने त्याच दिवशी जारी केलेल्या महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमांतर्गत अधिसूचनेचा संदर्भ देण्यात आला आहे.

शासनाच्या अधिसूचनेनुसार, ज्या ग्रामपंचायतींची मुदत संपली आहे आणि प्रशासकीय अडचणींमुळे त्या ग्रामपंचायतींच्या निवडणुका झालेल्या नाहीत, अशा ग्रामपंचायतींवर प्रशासक म्हणून नियुक्त करण्यासाठी शासनाला महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमातील तरतुदींनुसार अधिकार देण्यात आले आहेत. संबंधित अधिसूचनेत अशा ग्रामपंचायतींवर विस्तार अधिकारी (कृषी), विस्तार अधिकारी (आरोग्य), विस्तार अधिकारी (शिक्षण), विस्तार अधिकारी (पंचायत) किंवा अन्य शासकीय अधिकाऱ्यांची प्रशासक म्हणून नियुक्ती करण्याची तरतूद करण्यात आली आहे. ही व्यवस्था महाराष्ट्र शासन राजपत्रात अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीसाठी किंवा ग्रामपंचायत निवडणुकीची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत, यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत लागू राहणार आहे. या शासन निर्णयाच्या पार्श्वभूमीवर खुलताबाद पंचायत समितीने तालुक्यातील ग्रामपंचायतींच्या प्रशासकीय पदभाराबाबत स्वतंत्र आदेश काढला आहे. आदेशानुसार कागजीपुरा/ मावसाळा ग्रामपंचायतीचा पदभार के. एस. गवारे, सराई/ सोनखेडा एस. बी. साळुंके, पळसगावचा एन. एस. राजपूत, लोणीचा डी. एम. आदमवाड, वेरुळचा जी. जी. गायकवाड, कसाबखेडाचा पी. जी. घायगावरे, देरेगाव आर. आर. गात आणि खांडी पिंपळगाव एस. पी. लोनकर यांच्याकडे सोपविण्यात आला आहे. तसेच बोडखा ग्रामपंचायतीचा पदभार एस. डी. गवळी, पाडळीचा एम. एन. गायकवाड, निरगुडी/पिंपरीचा आर. आर. जाधव, देवळाणा/विरमगावचा जी. आर. आधाने, रसूलपुरा जे. यू. नागे, चिंचोलीचा आर. डी. जाधव, बाजारसावंगीचा बी. एम. पाटील आणि गल्हेबोरगावचा पी. बी. बनसोड यांच्याकडे देण्यात आला आहे. दरम्यान, वेरुळ ग्रामपंचायतीच्या अधिकाऱ्याकडे गदाना येथील अतिरिक्त पदभारही पुढील आदेशापर्यंत सोपविण्यात आला आहे.

पदभार हस्तांतरणाची प्रक्रिया तातडीने पूर्ण करून त्याबाबतची यादी पंचायत समिती कार्यालयात सादर करण्याचे निर्देश गटविकास अधिकारी गिरीश सोनार यांनी संबंधितांना दिले आहेत. आदेशाची अंमलबजावणी संबंधित ग्रामपंचायत अधिकारी आणि सरपंचांनी करावी, असेही आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे. महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास विभागाच्या ८ सप्टेंबर २०२६ रोजीच्या अधिसूचनेच्या पार्श्वभूमीवर झालेल्या या प्रशासकीय बदलामुळे संबंधित ग्रामपंचायतींचे दैनंदिन कामकाज सुरळीत करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

## सौदी अरेबियावर हुतींचा मोठा ड्रोन हल्ला; लष्करी तळाला लक्ष्य केल्याचा दावा, दोन जण जखमी

रियाद: मध्य-पूर्वेतील परिस्थिती दिवसेंदिवस अधिक स्फोटक आणि गंभीर होत चालली आहे. इराण आणि अमेरिकेमधील वाढत्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर, आता येमेनमधील हुती (Houthi) बंडखोरांनी सौदी अरेबियावर प्रत्यक्ष हल्ले तीव्र केले आहेत. हुतींनी सौदी अरेबियातील शरूराह येथील एका लष्करी तळाला लक्ष्य करून मोठा ड्रोन हल्ला केल्याचा दावा केला आहे.

हुतींचे लष्करी प्रवक्ते याह्या सारी यांनी टेलिग्रामवर जारी केलेल्या निवेदनातून या हल्ल्याची माहिती दिली. त्यांच्या दाव्यानुसार, या हल्ल्यात मोठ्या प्रमाणावर बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे आणि ड्रोनचा वापर करण्यात आला. हुतींनी सौदीच्या लष्करी तळावरील मुख्य शस्त्रसाठा केंद्र आणि कमांड-अँड-कंट्रोल रूमला लक्ष्य करत अचूक वेध घेतल्याचे यात म्हटले आहे. येमेनविरोधात सौदी अरेबियाकडून सुरू असलेल्या कारवाईला हे प्रत्युत्तर असल्याचे सांगत, सौदीने हल्ले न थांबवल्यास आगामी काळात देशाच्या अंतर्गत भागात आणखी घातक हल्ले करण्याचा इशारा बंडखोरांनी दिला आहे.

सौदीच्या नागरी संरक्षण विभागाने या हल्ल्यामुळे झालेल्या नुकसानीची पुष्टी केली आहे. अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, येमेनच्या दिशेने डागण्यात आलेले एक प्रक्षेपास्त्र जिझान येथे कोसळले, ज्यामध्ये दोन जण जखमी झाले आहेत. या हल्ल्यामुळे एका स्थानिक मशिदीसह अनेक निवासी इमारती आणि वाहनांचे मोठे नुकसान झाले आहे. यापूर्वी लाल समुद्राच्या प्रवेशद्वाराजवळील बाब-अल-मंदेब सामुद्रधुनीतील सामरिकदृष्ट्या महत्त्वाच्या मयून बेटावर हुतींनी ताबा मिळवला होता. मोखा बंदर शहरावरील ताबा मिळवण्याच्या प्रत्युत्तरात सौदी अरेबियाने मोखा विमानतळावर जोरदार हवाई हल्ले केले होते.

## सिल्लोडमध्ये पैठणी उद्योग उभारण्यासाठी आ. सत्तारांचा पुढाकार

### येवला येथील कापसे पैठणी फॅक्टरीला भेट; रोजगारनिर्मितीच्या संधींचा घेतला आढावा

सिल्लोड (प्रतिनिधी) दि. १३ : सिल्लोड-सोयगाव मतदारसंघातील बेरोजगारांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने सिल्लोड येथे पैठणी उद्योग सुरू करण्यासाठी आमदार अब्दुल सत्तार यांनी पुढाकार घेतला आहे. याच अनुषंगाने त्यांनी येवला, जि. नाशिक येथे कापसे फाउंडेशनच्या 'कापसे पैठणी' फॅक्टरीला भेट देऊन पैठणी उत्पादन प्रक्रिया, उद्योगाचे स्वरूप तसेच रोजगारनिर्मितीच्या संधींची माहिती जाणून घेतली. तसेच आमदार अब्दुल सत्तार यांनी फॅक्टरीतील विणकर कामगारांशी संवाद साधून त्यांच्या कामाची पद्धत, अडचणी तसेच रोजगाराच्या संधींबाबत माहिती जाणून घेतली.

यावेळी कापसे पैठणीचे संचालक बाळकृष्ण कापसे यांनी पैठणी उत्पादनाबाबत सविस्तर माहिती दिली. विशेष म्हणजे या फॅक्टरीमध्ये दिव्यांग, निराधार, मूकबधिर तसेच विधवा महिलांना रोजगार देऊन त्यांना स्वावलंबी करण्याचे काम केले जात



असल्याचे आमदार सत्तार यांनी पाहिले. या उपक्रमाचे कौतुक करताना अशा माध्यमातून गरजू महिलांना रोजगाराचा आधार मिळत असल्याचे त्यांनी नमूद केले.सिल्लोड येथील नॅशनल सहकारी सूतगिरणी येत्या काही दिवसांत सुरू होणार असून, त्यानंतर 'कापूस ते कापड' ही संकल्पना प्रत्यक्षात आणण्याच्या दृष्टीने पैठणी उद्योग महत्त्वाचा ठरू शकतो. सिल्लोड-सोयगाव परिसरात मोठ्या प्रमाणात गुणवत्तापूर्ण कापसाचे उत्पादन होत असल्याने या उद्योगासाठी स्थानिक पातळीवर अनुकूल वातावरण असल्याची चर्चा यावेळी झाली. आमदार सत्तार यांनी नॅशनल सहकारी सूतगिरणीबाबतही बाळकृष्ण कापसे यांना माहिती दिली.

कापसे पैठणीच्या प्रकल्पाची पाहणी करून हा उपक्रम शासनाच्या निदर्शनास आणून देण्यात येणार असून, शासनाचे सहकार्य मिळाल्यास महिला, दिव्यांग, निराधार तसेच बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने सिल्लोडमध्ये मोठा उपक्रम उभा राहू शकतो, असा विश्वास आमदार सत्तार यांनी व्यक्त केला.

## संपादकीय

### महाराष्ट्राचा लाडका गणेशोत्सव आता जागतिक पटलावर

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि सामाजिक अस्मितेचा केंद्रबिंदू असलेला सार्वजनिक गणेशोत्सव आता केवळ राज्यापुरता किंवा देशापुरता मर्यादित न राहता जागतिक पातळीवर पोहोचला आहे. महाराष्ट्र शासनाच्या पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी आणि सांस्कृतिक कार्य विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा २०२६' या उपक्रमाने यावर्षी एक ऐतिहासिक मजल मारली आहे. मागील वर्षी तालुकास्तरापर्यंत विस्तारलेल्या या स्पर्धेचा कॅनव्हास यंदा प्रथमच राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरापर्यंत वाढवण्यात आला आहे. जपान, श्रीलंका, जर्मनी, नायजेरिया आणि सिंगापूर यांसारख्या विविध देशांमधून प्राप्त झालेले अर्ज या महोत्सवाच्या जागतिक विस्ताराची आणि मराठी संस्कृतीच्या व्यापक प्रसाराची साक्ष देत आहेत. राज्य शासनाकडून गणेशोत्सावाला 'राज्य महोत्सव' म्हणून घोषित केल्यानंतर या उत्सवाच्या आयोजनात आणि दर्जात कमालीची पारदर्शकता आणण्यात आली आहे. महाराष्ट्रभरातून तब्बल ४३२ मंडळांनी या स्पर्धेसाठी अर्ज सादर केले असून, त्यात ठाणे जिल्ह्याने सर्वाधिक ५२ अर्ज करत आघाडी घेतली आहे. विशेष म्हणजे, या स्पर्धेचे परीक्षण पूर्णपणे पारदर्शक पद्धतीने व्हावे यासाठी तालुका व जिल्हास्तरीय समित्या थेट भेट देऊन कागदपत्रे, सांस्कृतिक वारशाचे जतन, पर्यावरणपूरक सजावट, प्रदूषणरहित वातावरण तसेच महिला, विद्यार्थी व ज्येष्ठ नागरिकांसाठी राबवलेले उपक्रम तपासणार आहेत. ऑनलाईन प्रणाली आणि जिओ टॅग फोटोच्या वापरामुळे या संपूर्ण प्रक्रियेत अचूकता आणि पारदर्शकता आली आहे. तसेच राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील विजेत्यांसाठी ७.५ लाख, ५ लाख आणि २.५ लाखांच्या घसघशीत पारितोषिकांची घोषणा करण्यात आली असून, यामुळे जगभरातील गणेश मंडळांमध्ये एक नवी ऊर्जा निर्माण झाली आहे. या स्पर्धेसोबतच १४ सप्टेंबरपासून सुरू होणारे विशेष पोर्टल जगभरातील गणेशभक्तांसाठी वरदान ठरणार आहे. या पोर्टलच्या माध्यमातून सार्वजनिक मंडळांच्या गणपतींचे थेट (Live) दर्शन आणि घरगुती गणपतींची छायाचित्रे जगभरातील भाविकांना घरबसल्या घेता येणार आहेत. सांस्कृतिक कार्यमंत्री अॅड. आशिष शेलार यांनी केलेल्या आवाहनानुसार, राज्य शासनाच्या या उपक्रमात मंडळांनी आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन आपल्या संस्कृतीचा हा सोहळा अधिक समृद्ध करावा. परदेशातही आपल्या परंपरेचा गोडवा जपणाऱ्या मराठी आणि भारतीय बांधवांच्या सहभागामुळे यंदाचा गणेशोत्सव खऱ्या अर्थाने 'ग्लोबल गणेशोत्सव' म्हणून इतिहासात नोंदवला जाईल यात शंका नाही.

# हरतालिका तृतीया पूजा साहित्य: घरातच पूजनाची तयारी करताय? 'या' वस्तू आणायला अजिबात विसरू नका!

हरतालिका तृतीया हा अखंड सौभाग्य आणि पतीच्या उदंड आयुष्यासाठी मानला जाणारा अत्यंत पवित्र आणि महत्त्वाचा सण आहे. भाद्रपद महिन्याच्या शुद्ध तृतीयेला हे व्रत केले जाते, ज्यामध्ये महिला आणि कुमारिका कडक उपवास ठेवून भगवान शिव आणि माता पार्वतीची मनोभावे पूजा करतात. पौराणिक कथेनुसार, माता पार्वतीने महादेवाला पतीरूपात मिळवण्यासाठी जंगलात जाऊन कठोर तपश्चर्या केली होती आणि याच दिवशी शंकराने त्यांचा स्वीकार केला होता. निष्ठा, भक्ती आणि त्यागाचे प्रतीक असलेल्या या व्रताची पूजा कशी करावी आणि त्यासाठी कोणते साहित्य लागते, याची सविस्तर माहिती खालीलप्रमाणे.

**हरतालिका तीज :** हरतालिका तीज हा विवाहित महिलांसाठी महत्त्वाचा सण मानला जातो. यंदा १४ सप्टेंबर २०२६ रोजी गणेश चतुर्थीसोबत हरतालिका तीज येत आहे. या दिवशी महिला भगवान शिव आणि माता पार्वतीची पूजा करून पतीच्या दीर्घायुष्यासाठी व्रत करतात.

**शिव-पार्वतीच्या मूर्ती :** हरतालिका तीजच्या पूजेसाठी शिव, पार्वती आणि भगवान गणेशाच्या मातीच्या किंवा वाळूच्या प्रतिमा तयार केल्या जातात. पूजा झाल्यानंतर या प्रतिमांचे विसर्जन करण्याची परंपरा आहे.

**सौभाग्याचे साहित्य आणि पूजेचे साहित्य :** पूजेसाठी लाल चुनरी, बिंदी, बांगड्या, मेहंदी, सिंदूर, कुंकू, काजळ, कंगवा, जोडवी, पैंजण यांसारखे



सौभाग्याचे साहित्य ठेवले जाते. या साहित्याला पूजेमध्ये विशेष महत्त्व असते. रोळी, अक्षता, हळद, चंदन, मौली, कापूर, कापूस, उदबत्ती, तुपाचा दिवा आणि माचिस यांसारख्या वस्तू पूजेसाठी आवश्यक असतात.भगवान शिवाच्या पूजेसाठी बेलपत्राला विशेष महत्त्व आहे. यासोबत फुले, फुलांच्या माळा, दूर्वा आणि शमीची पानेही पूजेसाठी ठेवली जातात.

**नैवेद्याचे साहित्य :** पूजेसाठी फळे, मिठाई, खीर, हलवा आणि भिजवलेले हरभरे यांचा नैवेद्य दाखवला जातो. आपल्या परंपरेनुसार नैवेद्याच्या पदार्थांमध्ये बदल केला जाऊ शकतो.

**कलश आणि जल :** पूजेसाठी कलश, स्वच्छ पाणी आणि गंगाजल ठेवले जाते. कलशासोबत नारळ आणि पूजेसाठी आवश्यक इतर साहित्याचीही तयारी केली जाते. शिव-पार्वतीच्या पूजेसाठी पंचामृत तयार केले जाते. यासाठी दूध, दही, मध, साखर आणि तूप या पदार्थांचा वापर केला जातो. पूजेसाठी पान, सुपारी, कच्ची हळदीच्या गाठी, गहू किंवा तांदूळ आणि कच्चा सूत यांसारखे साहित्यही आवश्यक असते.पूजेसाठी चौकी किंवा आसन तयार केले जाते. मंडपासाठी केळीची पाने आणि सजावटीसाठी फुले वापरली जातात. पूजा सुरू करण्यापूर्वी सर्व साहित्य व्यवस्थित मांडून ठेवणे सोयीचे ठरते.

**हरतालिका व्रताचे नियम :** हरतालिका तीजचे व्रत अनेक महिला निर्जला ठेवतात. म्हणजेच या दिवशी अन्न आणि पाणी ग्रहण केले जात नाही. मात्र, आरोग्याच्या दृष्टीने उपवास करण्यापूर्वी स्वतःच्या प्रकृतीचा विचार करणे महत्त्वाचे आहे. हरतालिका तीजच्या दिवशी रात्री जागरणाला धार्मिक महत्त्व दिले जाते. तसेच शिव-पार्वतीची पूजा केल्यानंतर हरतालिका तीजची कथा ऐकण्याची परंपरा आहे. दुसऱ्या दिवशी सूर्योदयानंतर व्रत सोडले जाते.

# सेवा संकल्प अभियान लोकचळवळ करा!; ग्रामपंचायतींनी स्थानिक गरजांनुसार उपक्रम राबवावेत : मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके

छत्रपती संभाजीनगर : शासनाच्या योजना आणि विविध सेवा पात्र लाभार्थ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी जिल्ह्यात १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर या कालावधीत राबविण्यात येणारे 'सेवा संकल्प अभियान' केवळ शासकीय उपक्रम न राहता लोकसहभागातून प्रभावी लोकचळवळ बनवावे, असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके यांनी केले.

जिल्ह्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीने स्थानिक गरजा ओळखून आरोग्य, महिला व बाल विकासासह सर्व संबंधित विभागांच्या समन्वयातून विविध उपक्रम राबवावेत. शासनाच्या सेवा आणि योजनांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्यासोबतच नागरिकांचा शासनाशी थेट संवाद वाढविणे, हा अभियानाचा प्रमुख उद्देश आहे.

महिला, बालके, युवक, ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग तसेच वंचित आणि गरजू घटकांना अभियानाच्या केंद्रस्थानी ठेवण्यात यावे. यासाठी आरोग्य तपासणी शिबिरे, महिला आरोग्य व स्वच्छता जनजागृती, पोषण व अॅनिमिया प्रतिबंध, योग-ध्यान, व्यसनमुक्ती, स्वच्छता, वृक्षारोपण, जलसंधारण आणि आरोग्य जनजागृतीसह विविध उपक्रम घेण्यात यावेत, असे सोळंके यांनी सांगितले.

शासकीय योजनांची केवळ माहिती न देता पात्र लाभार्थ्यांना प्रत्यक्ष लाभ मिळवून देण्यासाठी ग्रामपंचायत पातळीवर विशेष प्रयत्न करावेत. 'सेवा माझे योगदान' या संकल्पनेला लोकसहभागाची जोड देत प्रत्येक गावाने आपल्या क्षमतेनुसार सेवा आणि सामाजिक योगदानाचे उपक्रम राबवावेत.

दरम्यान, 'माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव' अभियानांतर्गत सुरू असलेले आरोग्य, पोषण, स्वच्छता, महिला व बाल आरोग्य आणि जनजागृतीचे उपक्रम 'सेवा संकल्प अभियानाशी' जोडण्यात यावेत. त्यामुळे दोन्ही अभियानांचा व्यापक परिणाम साधता येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

'शासनाची सेवा – जनतेच्या दारी' हा संकल्प प्रत्यक्षात आणण्यासाठी अधिकारी-कर्मचारी, ग्रामपंचायत पदाधिकारी, आरोग्य कर्मचारी, आशा स्वयंसेविका, अंगणवाडी सेविका, महिला बचत गट, युवक मंडळे आणि नागरिकांनी सक्रिय सहभाग नोंदवावा. प्रत्येक पात्र नागरिकापर्यंत शासनाच्या सेवा पोहोचवून गावांना अधिक सक्षम, निरोगी आणि स्वावलंबी बनविणे, हेच 'सेवा संकल्प अभियानाचे' खरे यश ठरेल, असे मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके यांनी नमूद केले.

# मराठवाडा मुक्ती संग्राम दिनी विविध विकासकामांचा धडाका; मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन-भूमिपूजन

**छत्रपती संभाजीनगर :** मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या पार्श्वभूमीवर १७ सप्टेंबर रोजी विभागीय क्रीडा संकुलात आयोजित करण्यात येणाऱ्या कार्यक्रमाची प्रशासकीय तयारी वेगाने सुरू झाली आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत शहरातील विविध विकासकामांचे उद्घाटन आणि भूमिपूजन करण्याचे नियोजन असून, त्यासाठी प्रशासनाने कार्यक्रमस्थळाची पाहणी करून तयारीचा आढावा घेतला.



विभागीय आयुक्त जी. श्रीकांत, जिल्हाधिकारी विनय गौडा आणि छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका आयुक्त अमोल येडगे यांनी संयुक्तपणे क्रीडा संकुल परिसराची पाहणी केली. कार्यक्रमासाठी आवश्यक असलेल्या सुविधा, सुरक्षा व्यवस्था, बैठक व्यवस्था आणि इतर बाबींचा त्यांनी आढावा घेत संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या.

कार्यक्रमासाठी स्टेडियम परिसरात किमान पाच हजार विद्यार्थी व विद्यार्थिनींची बैठक व्यवस्था करण्याचे नियोजन आहे. विद्यार्थ्यांना कार्यक्रमस्थळी पोहोचताना तसेच कार्यक्रमानंतर परतताना वाहतुकीची किंवा अन्य कोणतीही अडचण होऊ नये, यासाठी स्वतंत्र नियोजन करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

महापालिकेची दहा विकासकामे केंद्रस्थानी

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या विविध विकासकामांपैकी किमान दहा कामांचे उद्घाटन अथवा भूमिपूजन मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते करण्याचे प्राथमिक नियोजन आहे. या कामांची माहिती, कार्यक्रमाची रूपरेषा आणि संबंधित विभागांकडून आवश्यक तयारी तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले. कार्यक्रमस्थळी स्वच्छता, पिण्याचे पाणी, विद्युत व्यवस्था, वाहतूक नियंत्रण, बैठक व्यवस्था तसेच सुरक्षा यंत्रणेच्या दृष्टीने कोणतीही त्रुटी राहू नये, यावर प्रशासनाने विशेष भर दिला आहे.

सुरक्षा आणि वाहतुकीवर विशेष लक्ष

मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमस्थळी सुरक्षा व्यवस्थेला विशेष महत्त्व राहणार आहे. त्याचबरोबर मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित राहणार असल्याने गर्दीचे नियोजन, प्रवेश-निर्गमन व्यवस्था आणि वाहतूक नियंत्रण याबाबतही काटेकोर नियोजन करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

पाहणीदरम्यान अतिरिक्त आयुक्त रणजीत पाटील, शहर अभियंता संजय कोंबडे, अतिरिक्त शहर अभियंता अमोल कुलकर्णी, उपायुक्त अपर्णा थेटे, नंदकिशोर भोंबे यांच्यासह महानगरपालिका आणि संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

१७ सप्टेंबरच्या मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त होणारा हा कार्यक्रम सुरळीत पार पडावा आणि मुख्यमंत्र्यांच्या हस्ते प्रस्तावित विकासकामांना गती मिळावी, यासाठी प्रशासनाकडून अंतिम तयारीला आता वेग आला आहे.

# मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत लिहाखेडी फाटा ते सारोळा रस्त्याच्या कामाचे लोकार्पण

सिल्लोड प्रतिनिधी

मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत सारोळा येथे लिहाखेडी फाटा ते सारोळा रस्त्याच्या कामाचे लोकार्पण माजी मंत्री तथा आमदार अब्दुल सत्तार यांच्या हस्ते संपन्न झाले. आमदार अब्दुल सत्तार यांच्या पुढाकारातून या रस्त्याच्या कामासाठी ४ कोटी ९० लाखांचा निधी उपलब्ध झाला आहे.



या प्रसंगी शिवसेना तालुकाप्रमुख केशवराव पा. तायडे, जि. प. सदस्य देविदास पालोदकर, सय्यद नासेर हुसेन, कृ. उ. बा. समितीचे सभापती सतीश ताठे, संचालक नानासाहेब रहाटे, उपनगराध्यक्ष विठ्ठल सपकाळ, शिवसेनेचे नगरपरिषद गटनेते सुधाकर पाटील, नगरसेवक सिद्धेश्वर आहेर, नायब तहसिलदार तुकाराम बनकर, साहाय्यक गटविकास अधिकारी आशिष म्हस्के, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता वसीम देशमुख, प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेचे मंगेश डाबके, विशाल वहाढणे तसेच नॅशनल सहकारी सूतगिरणीचे संचालक राजेंद्र ठोंबरे, सयाजीराव वाघ, संजय डमाळे, दुर्गाबाई पवार, अशोक देशमुख, प्रशांत क्षीरसागर, राजीव गौर, सचिन पाखरे , राजूमिया देशमुख, अंबादास सपकाळ, प्रकाश साखळे, मारुती पाटील वराडे, रुपेश जयस्वाल, सरपंच मोहन गायकवाड, उपसरपंच नारायण वराडे, कृष्णा बावस्कर, मुक्ताराम पाटील ,विष्णू पैलवान ,विश्वनाथ डापके, लक्ष्मण कल्याणकर ,विलास बावस्कर, सिताराम गोरे ,शेषराव फरकाडे, गणेश काकडे, इम्रान काझी, दादाराव समीन्द्रे , नागेश वराडे, युवराज वराडे, डॉ.प्रवीण वराडे, संदीप लोखंडे, परमेश्वर लहाने, सुनील सनान्से, जफर सय्यद, आरेफ सय्यद, आसिफ सय्यद, प्रवीण जैस्वाल, मच्छिन्द्र दांडगे, आनंदा वराडे यांच्यासह ग्रामस्थ, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. या रस्त्याची ग्रामस्थांकडून अनेक दिवसांपासून मागणी होती. विधानसभा निवडणुकीदरम्यान आमदार अब्दुल सत्तार यांनी सारोळा ग्रामस्थांना हा रस्ता पूर्ण करण्याचा शब्द दिला होता. दिलेल्या शब्दाची पूर्तता करत रस्त्याचे काम पूर्ण करून आज त्याचे लोकार्पण करण्यात आले. दिलेला शब्द पूर्ण करता आला, याचा मनस्वी आनंद आहे, असे आमदार अब्दुल सत्तार यांनी यावेळी सांगितले.

या रस्त्यामुळे सारोळा व परिसरातील नागरिक, शेतकरी आणि विद्यार्थ्यांच्या दळणवळणाची मोठी सोय होणार असून, शेतमालाची वाहतूकही सुलभ होणार आहे. रस्ता पूर्ण झाल्याने गावाच्या विकासाला नवी गती मिळणार आहे.

यावेळी आमदार अब्दुल सत्तार यांचा लिहाखेडी व सारोळा ग्रामस्थांच्या वतीने सत्कार करून या कामाबद्दल गावकऱ्यांनी आभार मानले.

## विश्वबंधुत्व पंधरवाड्यात सहभागी होण्याचे आवाहन

छत्रपती संभाजीनगर, (जिमाका)-: स्वामी विवेकानंद यांनी दि. 11 सप्टेंबर 1893 रोजी अमेरिकेतील शिकागो येथे जागतिक धर्म संसदेत केलेल्या ऐतिहासिकभाषणातून जगाला दिलेला सर्वधर्मसमभाव, सहिष्णुता, मानवता,परस्पर सन्मान आणि विश्वबंधुत्वाचा संदेश समाजाच्या विविधघटकांपर्यंत व्यापक स्वरूपात पोहोचविण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र संशोधन,उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) यांच्या वतीने सन २०२६ पासून दरवर्षी 11 ते 26 सप्टेंबर दरम्यान 'विश्वबंधुत्व पंधरवडा' साजरा करण्यात येतो. यंदाही हा पंधरवडा साजरा होणार आहे. त्यात नागरिकांनी, संस्थांनी सहभागी व्हावे असे आवाहन अमृत संस्थेने केले आहे. उपक्रमात सहभागी संस्थांनी आपल्या स्तरावर विविध स्पर्धा, चर्चासत्रे, व्याख्याने, जनजागृतीपरउपक्रम तसेच मूल्याधिष्ठित कार्यक्रम आयोजित करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे. सहभागी संस्थांनी https://vbd.mahaamrut.org.in/ यापोर्टलवर ऑनलाइन नोंदणी करावी. अधिक माहितीसाठी- विभागीय व जिल्हा कार्यालय - अमृत, पुंडलिक नगर रोड, सेक्टर-४ सिडको, हनुमाननगर,पाण्याच्याटाकीजवळ,छत्रपतीसंभाजीनगर–४३१००९ येथे संपर्क साधावा. संपर्क क्रमांक-७३९१०६५४७५ / ९४०३२००६०६.

## कुणबी जात प्रमाणपत्रासाठी विशेष शिबिरात जिल्ह्यात आतापर्यंत 389 अर्ज प्राप्त

छत्रपती संभाजीनगर, (जिमाका) : छत्रपती संभाजीनगरात दि. 10 व 11 सप्टेंबर 2026 या कालावधीत झालेल्या 28 विशेष शिबीरात कुणबी-मराठा जात प्रमाणपत्र वितरणासाठी जिल्ह्यात मंडळस्तरावर 28 शिबिरे घेण्यात आली. या शिबिरांमध्ये आतापर्यंत एकूण 389 अर्ज प्राप्त झाले असल्याची माहिती जिल्हाधिकारी जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी.यांनी दिली आहे. तालुकानिहाय प्राप्त अर्जांमध्ये उप विभाग छत्रपती संभाजीनगर तालुक्यातील शिबिरात 44, उपविभाग पैठण व फुलंब्रीमधील 143, उपविभाग वैजापूर व गंगापूर मधील 37, उपविभाग कन्नड खुलताबाद मधील 153, उपविभाग सिल्लोड व सोयगाव मधील 12 असे एकूण 389 अर्जांचा समावेश आहे. प्राप्त 389 अर्जांपैकी समितीअंतर्गत 270, तर गॅझेटअंतर्गत 255 अर्ज आहेत. काही प्रस्तावांची ऑनलाइन प्रक्रिया बाकी असून, उर्वरित प्रकरणांवर तालुकास्तरीय वंशावळ समितीच्या बैठकीत निर्णय झाल्यानंतर तातडीने पुढील कार्यवाही करून अर्ज निकाली काढण्यात येणार असल्याचेही जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी कळविले आहे.

## ब्लु व्हॅली इंग्लिश स्कूलमध्ये 'गोविंदा'च्या जयघोषात श्रीकृष्ण जन्माष्टमी उत्साहात साजरी

बिडकीन : पैठण तालुक्यातील बिडकीन येथील ब्लु व्हॅली इंग्लिश स्कूलमध्ये श्रीकृष्ण जन्माष्टमीचा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात शाळेच्या मुख्याध्यापिका सविता तोतला तसेच शाळेतील सर्व शिक्षक-शिक्षिकांच्या हस्ते श्रीकृष्णाच्या मूर्तीचे पूजन करून करण्यात आली.

## स्वामी विवेकानंद ग्लोबल स्कूलमध्ये गणेशमूर्ती बनविण्याची कार्यशाळा

वाळुज महानगर : आसेगाव येथील स्वामी विवेकानंद ग्लोबल स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज येथे विद्यार्थ्यांसाठी पर्यावरणपूरक गणेशमूर्ती बनविण्याच्या विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेला विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत शाडू मातीपासून आकर्षक गणेशमूर्ती तयार करण्याचे कौशल्य आत्मसात केले.

शाळेच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी ही कार्यशाळा मोफत आयोजित करण्यात आली होती. यावेळी प्रशिक्षक हिरा रवि धनुरे यांनी विद्यार्थ्यांना शाडू मातीपासून सुंदर व आकर्षक गणेशमूर्ती तयार करण्याच्या विविध पद्धतींचे प्रात्यक्षिकासह





मार्गदर्शन केले. तसेच गणेशोत्सवात पर्यावरणपूरक गणेशमूर्तींची प्रतिष्ठापना करण्याचे आवाहन करत विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धनाविषयी जनजागृती केली. कार्यशाळेच्या प्रारंभी शाळेच्या संचालिका गीता फाळके, सचिव रत्नाकर फाळके, प्राचार्य योगेश फाळके व मुख्याध्यापिका रोशनी कांबळे यांनी प्रशिक्षक हिरा रवि धनुरे यांचे स्वागत केले.

कार्यशाळा यशस्वी आयोजनासाठी शिक्षक योगेश तंटक, नागेश लिंगायत, सत्यजित पवार, आदित्य घुगे, परमेश्वर उबाळे, दुर्गेश कामथे, अजिनाथ पल्हाळ तसेच शिक्षिका अनिसा शेख, नम्रता थोरात, आसमा पठाण, शोभा नागरे, अर्चना थळपती, सविता राजगुरू, सुनिता बहुरे, पूजा कावडे, वर्षा काळवणे, जयश्री मस्के, सोनम भगुंडे, सुनिता त्रिभुवन, सुनिता सूर्यवंशी, ज्ञानेश्वरी देवचे, अश्विनी जाधव, रोहिणी पल्हाळ, अनुराधा यादव, सुषमा गोल्हार, वैष्णवी बनकर तसेच शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## सारोळा यात्रेला आमदार अब्दुल सत्तार यांची सदिच्छा भेट

सिल्लोड प्रतिनिधी

पोळा पाडव्याच्या निमित्ताने सिल्लोड तालुक्यातील सारोळा येथे पारंपरिक यात्रा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यात्रेनिमित्त तालुक्यासह परिसरातील भाविकांनी मोठी गर्दी केली होती. दरवर्षीप्रमाणे यंदाही माजी मंत्री तथा आमदार अब्दुल सत्तार यांनी यात्रेस सदिच्छा भेट दिली.



यावेळी आमदार सत्तार यांनी गयबनशाह वली दर्गाह येथे चादर चढवून, तसेच श्री गहिनीनाथ महाराजांच्या मूर्तीस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. राज्यात समाधानकारक पर्जन्यवृष्टी होऊन बळीराजा सुखी-समृद्ध व्हावा, यासाठी त्यांनी प्रार्थना केली.

यात्रेस आलेल्या भाविकांशी संवाद साधत आमदार सत्तार यांनी यात्रा उत्सव व पोळा पाडव्याच्या शुभेच्छा दिल्या. सारोळ्याची पारंपरिक यात्रा सामाजिक एकोपा, श्रद्धा आणि भक्तीची सुंदर परंपरा जपणारी असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी शिवसेना तालुकाप्रमुख केशवराव पा. तायडे, जि. प. सदस्य देविदास पालोदकर, सय्यद नासेर हुसेन, कृ. उ. बा. समितीचे सभापती सतीश ताठे, संचालक नानासाहेब रहाटे, उपनगराध्यक्ष विठ्ठल सपकाळ, शिवसेनेचे नगरपरिषद गटनेते सुधाकर पाटील, नगरसेवक सिद्धेश्वर आहेर, नॅशनल सहकारी सूतगिरणीचे संचालक राजेंद्र ठोंबरे, सयाजीराव वाघ, संजय डमाळे, दुर्गाबाई पवार, अशोक देशमुख, प्रशांत क्षीरसागर, राजीव गौर, सचिन पाखरे, राजूमिया देशमुख, अंबादास सपकाळ, प्रकाश साखळे, मारुती पाटील वराडे, रुपेश जयस्वाल, सारोळा सरपंच मोहन गायकवाड, उपसरपंच नारायण वराडे, कृष्णा बावस्कर, मुक्तारामा पाटील, विष्णू पैलवान, विश्वनाथ डापके, लक्ष्मण कल्याणकर, विलास बावस्कर, सिताराम गोरे, शेषराव फरकाडे, गणेश काकडे, इम्रान काझी, दादाराव समीन्द्रे, नागेश वराडे, युवराज वराडे, डॉ. प्रवीण वराडे, संदीप लोखंडे, परमेश्वर लहाने, सुनील सनान्से, जफर सय्यद, आरेफ सय्यद, आसिफ सय्यद, प्रवीण जैस्वाल, मच्छिन्द्र दांडगे, आनंदा वराडे यांच्यासह भाविकभक्तांची उपस्थिती होती.

# मुख्यालयाच्या सक्तीविरोधात गंगापूरमध्ये शिक्षकांचा एल्गार

गंगापूर प्रतिनिधी : ग्रामीण भागातील शिक्षकांना निवास व्यवस्था उपलब्ध करून दिल्याशिवाय मुख्यालयी वास्तव्याची सक्ती करू नये, या मागणीवरून गंगापूर तालुक्यातील शिक्षक आक्रमक झाले असून शिक्षकांच्या न्याय्य हक्कांसाठी तालुक्यातील सर्व शिक्षक संघटनांनी एकत्र येत मंगळवार, १५ सप्टेंबर रोजी सामूहिक रजा घेऊन मोर्चा व धरणे आंदोलन करण्याचा निर्णय घेतला आहे.

मुख्यालयाच्या अंमलबजावणीच्या प्रश्नावरून शिक्षकांमध्ये निर्माण झालेला मानसिक ताण, असुरक्षिततेची भावना आणि प्रत्यक्ष भेडसावणाऱ्या निवासाच्या समस्यांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी हे आंदोलन करण्यात येणार आहे. ग्रामीण भागातील अनेक शाळांच्या ठिकाणी शिक्षकांसाठी शासनाची स्वतंत्र निवासव्यवस्था उपलब्ध नसल्याने भाड्याने घर किंवा खोली मिळण्यापासून ते कुटुंबासह वास्तव्य करण्यापर्यंत अनेक अडचणी निर्माण होत असल्याचे संघटनांचे म्हणणे आहे.

पती-पत्नी शिक्षकांची वेगवेगळ्या गावांत नियुक्ती, कुटुंबासाठी पुरेशी निवासाची सोय नसणे आणि उपलब्ध घरांची मर्यादित संख्या यामुळे मुख्यालयी राहण्याचा प्रश्न अधिक गुंतागुंतीचा बनला आहे. त्यातच मुख्यालयाच्या नावाखाली शाळेच्या गावात अथवा शाळेच्या परिसरात त्रयस्थ व्यक्तींकडून शिक्षकांना त्रास दिला जात असल्याचा आरोपही संघटनांनी केला आहे. त्यामुळे शिक्षकांना सन्मानपूर्वक आणि निर्भय वातावरणात काम करता यावे, यासाठी प्रशासनाने स्पष्ट व संवेदनशील भूमिका घ्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. वडाचे झाड,लासूर रोड पासून मोर्चा; छत्रपती शिवाजी महाराज चौकातून पंचायत समितीकडे कूच

१५ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता लासुर नाक्या जवळील सार्वजनिक विश्रामगृहासमोरील वडाच्या झाडाजवळील मैदानातून मोर्चाला सुरुवात होणार आहे.

महाराणा प्रताप चौक, लासूर नाका आणि छत्रपती शिवाजी महाराज चौक मार्गे मोर्चा गटविकास अधिकारी कार्यालय, गंगापूर येथे पोहोचेल. तेथे शिक्षकांच्या मागण्यांसाठी धरणे आंदोलन करण्यात येणार आहे.

आंदोलनस्थळी गटविकास अधिकारी, गटशिक्षणाधिकारी आणि पोलीस प्रशासनाच्या अधिकाऱ्यांसमक्ष मुख्यालय समन्वय समितीची भूमिका मांडून निवेदन देण्यात येणार आहे.

तहसीलदारांनाही शिष्टमंडळ देणार निवेदन

दरम्यान, आंदोलनाच्या काळात समन्वय समितीचे शिष्टमंडळ गंगापूर तहसील कार्यालयात जाऊन तहसीलदारांची भेट घेणार असून, मुख्यालयाच्या प्रश्नासंदर्भातील निवेदन त्यांना सादर करण्यात येणार आहे. मुख्यमंत्री, ग्रामविकास मंत्री, शिक्षण मंत्री, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, प्राथमिक शिक्षणाधिकारी, गटविकास अधिकारी, गटशिक्षणाधिकारी तसेच पोलीस प्रशासनाकडेही यापूर्वी निवेदने सादर करण्यात आल्याचे संघटनांकडून सांगण्यात आले.

'आधी निवास, मग सक्ती'वर शिक्षक ठाम

शासनाने ग्रामीण भागातील शिक्षकांसाठी पुरेशी व सुरक्षित निवासव्यवस्था निर्माण करावी आणि त्यानंतरच मुख्यालयी वास्तव्याची सक्ती करावी, अशी स्पष्ट भूमिका समन्वय समितीने घेतली आहे. "शिक्षकांना सुविधा न देता मुख्यालयाची सक्ती नको; आधी निवासव्यवस्था, मग अंमलबजावणी," या भूमिकेसाठी तालुक्यातील सर्व शिक्षकांनी १५ सप्टेंबरच्या आंदोलनात सामूहिक रजा घेऊन सहभागी व्हावे, असे आवाहन समन्वय समितीने केले आहे.

# वेरुळमध्ये 17 सप्टेंबरला विश्वकर्मीय समाजाचा महामेळावा

## रोजगार, उद्योग-व्यवसाय मार्गदर्शनासह शासकीय योजनांची माहिती; प्रदर्शनासाठी स्टॉलची संधी

छत्रपती संभाजीनगर : विश्वकर्मा वंशीय समाज संघटनेच्या वतीने प्रभू विश्वकर्मा प्रकट दिनानिमित्त गुरुवार, १७ सप्टेंबर रोजी श्री क्षेत्र वेरूळ, ता. खुलताबाद येथे सुतार, लोहार, सोनार, तांबट, पाथरवट यांच्यासह विश्वकर्मीय समाज बांधवांचा महामेळावा आणि भव्य रोजगार, उद्योग व व्यवसाय मार्गदर्शन शिबिर आयोजित करण्यात आले आहे. महाराष्ट्रातील विश्वकर्मीय समाज बांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. नागोराव पांचाळ आणि कार्याध्यक्ष अरुण भालेकर यांनी केले आहे.



मेळाव्याच्या आयोजनासाठी विविध समित्या स्थापन करण्यात आल्या असून, संस्थापक अध्यक्ष प्रा. नागोराव पांचाळ यांच्या मार्गदर्शनाखाली प्रदेशाध्यक्ष सचिन सुतार, राज्य कार्याध्यक्ष अरुण भालेकर, राज्य उपाध्यक्ष राजेश नागपुरे व गोपाल राऊत, सरचिटणीस संजय सुतार, राज्य सचिव विलास पवार, धनराज वेलणकर, तानाजी शेटे, केशव सपकाळ, जिल्हा शहराध्यक्ष अमोल डोळस, शहर कार्याध्यक्ष किशोर सिरसाठ, ग्रामीण जिल्हाध्यक्ष सोमनाथ राऊत, परमेश्वर पांचाळ, बालाजी पांचाळ, प्रवक्ते भाऊसाहेब राऊत, राज्य संघटक राजकुमार राऊत, प्रसिद्धीप्रमुख भगवान राऊत यांच्यासह राज्य, विभाग व जिल्हा पदाधिकारी परिश्रम घेत आहेत.

स्टॉल बुकिंगसाठी गोपाल राऊत (९७६४७२२७४२), आंबटसर (९८२३२३०४७८) आणि केशव सपकाळ (८३२९३०२३२८) यांच्याशी संपर्क साधावा.

वेरूळ येथील विश्वकर्मा मंदिर, कन्नड रोड येथे दिवसभर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. मिरवणूक, उद्घाटन, रोजगार मेळावा, उद्योग-व्यवसाय मार्गदर्शन, शासकीय योजनांची माहिती, लघुउद्योजकांचे प्रदर्शन, स्टॉल व विक्री, पुरस्कार वितरण आणि समारोप असे कार्यक्रम होणार आहेत.

खादी व ग्रामोद्योग, जिल्हा उद्योग केंद्र, सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग विभाग (एमएसएमई), जिल्हा कौशल्य विकास विभाग तसेच आर्थिक विकास महामंडळाचे अधिकारी उपस्थित राहून विविध योजनांची माहिती देणार आहेत. पंतप्रधान विश्वकर्मा योजना, बांधकाम कामगार योजना तसेच मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम (सीएमईजीपी) आणि पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम (पीएमईजीपी) यांच्या माध्यमातून उद्योग उभारणीबाबत मार्गदर्शन केले जाणार आहे.

या मेळाव्यात बेरोजगार तरुण, व्यावसायिक, लघुउद्योजक, व्यापारी आणि महिला बचत गटांच्या प्रतिनिधींनी सहभागी होऊन आपल्या उत्पादनांचे व व्यवसायाचे प्रदर्शन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. नाममात्र दरात स्टॉल उपलब्ध करून देण्यात येणार असून, यामुळे उद्योजकांना नवीन ग्राहक, बाजारपेठ आणि व्यवसायाच्या संधी मिळणार आहेत.

# 'रंगमुक्त व १००% नैसर्गिक इको-फ्रेंडली पोळा' साजरा



ताडपिंपळगाव: कृषी भूषण युवा शेतकरी पुरस्कार प्राप्त (महाराष्ट्र शासन), भारत बापूराव जाधव शेती निष्ठ शेतकरी पुरस्कार (महाराष्ट्र शासन), रंगांमुळे बैलांच्या त्वचेला ॲलर्जी होणे, केस गळणे (Hair Loss), डोळ्यांची जळजळ व अंधत्व येणे, तसेच विषारी रसायने जिभेने चाटल्यास विषबाधा होण्याचा मोठा धोका असतो. म्हणूनच यावर्षी आम्ही 'रंगमुक्त व १००% नैसर्गिक इको-फ्रेंडली पोळा' साजरा करत आहोत. "दरवर्षी केमिकलच्या रंगांमुळे बैलांच्या अंगावरील केस गळतात, त्वचेला खाज सुटून इन्फेक्शन होते आणि रंगाचे कण डोळ्यात जाऊन डोळे खराब होतात. बैल स्वतःला चाटतात तेव्हा हे विषारी रसायन पोटात जाऊन त्यांना विषबाधाही होते. म्हणूनच यावर्षी आम्ही रसायनांना पूर्ण फाटा देऊन आमच्या बैलांची संपूर्ण सजावट केवळ नैसर्गिक झेंडूच्या फुलांनी केली आहे. हा संदेश संपूर्ण महाराष्ट्रात जावा आणि शेतकरी राजाच्या या सच्चा सोबत्याचे आरोग्य सुरक्षित राहावे, हाच आमचा उद्देश आहे!" ताडपिंपळगाव ता.कन्नड जिल्हा छत्रपती संबाजीनगर.

# शिवहरी मुंढे, माजी जिल्हा उप नियंत्रक छत्रपती संभाजीनगर जिल्हा यांची निवड

मुंबई : शिवहरी मुंढे, माजी जिल्हा उप नियंत्रक छ संभाजी नगर जिल्हा यांची निवड महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग यांचे आदेशानुसार पालघर येथील ग्राहक तक्रार निवारण मंचच्या स्वतंत्र सदस्यपदी करण्यात आली आहे. शिवहरी मुंढे यांनी शासकीय सेवेच्या काळात ग्राहक जागृती व ग्राहक संरक्षण कार्यात मोलाचा सहभाग घेतला होता. श्री मुंढे हे स्वतः मेकॅनिकल इंजिनिअर असून विधि शिक्षणशाखेचे विद्यार्थी आहेत तसेच त्यांना शासकीय सेवेतील प्रशासनाचा दांडगा अनुभव आहे.अखिल भारतीय ग्राहक पंचायत व इतर ग्राहक संस्थांच्या समवेत ग्राहक जागरणाचे केलेल्या कार्याची दखल घेऊन आयोगाने त्यांची नियुक्ती केली आहे. सध्या श्री मुंढे हे केंद्रीय ग्राहक संरक्षण समितीचे प्रमुख राज्य सल्लागार सुद्धा आहेत. या प्रसंगी ग्राहक पंचायतचे मा श्री धनंजय मुळे, श्री रामदास ठोंबरे, केंद्रीय ग्राहक संरक्षण समितीतीचे संस्थापक श्री ऍड मिर्झा जावेद बेग यांनी तसेच वजने व मापे विभागाचे अधिकारी श्री चाटे श्री गिरणारे यांनी श्री मुंढे यांचे अभिनंदन केले. याप्रसंगी श्री मुंढे यांनी ग्राहक संरक्षणाचे कार्य पुढे सुरु ठेऊन पदाला योग्य न्याय देण्याचे अभिवचन दिले.

# मधुमक्षिका जिवंत राहिली तरच जीवसृष्टी जिवंत राहील - गणेश बुरकूल

## ॲग्रोव्हिजन गटशेती संघाचे अकोला देव येथे मासिक चर्चासत्र उत्साहात संपन्न

जाफराबाद : मधुमक्षिका जिवंत राहिली तरच जीवसृष्टी जिवंत राहील असे मधुमक्षिका तज्ञ् श्री. गणेश बुरकूल यांनी सांगितले.

जाफराबाद तालुक्यातील अकोला देव येथे ॲग्रोव्हिजन गटशेती संघाच्या नियमित मासिक चर्चासत्राचे बुधवार ( दि. ९ सप्टेंबर ) रोजी आयोजन करण्यात आले होते. या चर्चासत्र कार्यक्रमात शेतकऱ्यांना मार्गदर्शन करतांना श्री. गणेश बुरकूल बोलत होते.




ॲग्रोव्हिजन गटशेती संघाच्या माध्यमातून गेल्या अनेक वर्षांपासून शेतकऱ्यांमध्ये सातत्याने संवाद, ज्ञानविनिमय आणि सामूहिक शेतीची चळवळ निर्माण करण्याचे काम सुरू आहे. नियमित चर्चासत्रांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना नवनवीन प्रयोग, बाजारपेठ, शेतीतील संधी आणि बदलत्या परिस्थितीशी जुळवून घेण्याबाबत मार्गदर्शन मिळत असल्याचे ॲग्रोव्हिजन गटशेती संघांचे संस्थापक प्रमुख श्री. संजय मोरे पाटील यांनी आपल्या प्रस्ताविकात सांगितले.

या वेळी झालेल्या शिवारफेरीत ॲग्रोव्हिजन गटशेती संघाचे संस्थापक प्रमुख संजय मोरे पाटील, जमीर शेख, दत्तात्रय पंडित, गणेश बुरकूल, सुधीर जोशी, मोतीराम अंधारे, गणपत भिताडे, दत्तात्रय सवडे, दत्तात्रय देठे, पंढरीनाथ देठे, गणेश पिंपळे, भाऊसाहेब सवडे, गजानन जितकर, रामराव पाचे यांच्यासह अन्य शेतकरी सहभागी झाले होते.

चर्चासत्र कार्यक्रमाला सर्वश्री. दिपक जितकर, विनोद घोडसे, सुरेश देशमाने, अशोक मोढेकर, विकास घोडसे, ऋषिकेश घोडसे, भुजंगराव शेडगे, भाऊसाहेब कदम, संतोष चाटे, विकास देशमाने, योगेश सवडे, गणेश जाधव यांच्यासह अनेक शेतकरी उपस्थित होते.

श्री. सुधीर जोशी यांनी उपस्थितांचे आभार मानले. वनभोजनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# पात्र नागरिकांनी मतदार नोंदणीची संधी साधावी – जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी.

छत्रपती संभाजीनगर, (जिमाका) – विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम (SIR)-2026 अंतर्गत जिल्ह्यातील सर्व मतदान केंद्रांवर दि. 19, 20, 26 व 27 सप्टेंबर रोजी विशेष मतदार नोंदणी शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. पात्र नागरिकांनी या शिबिरांचा लाभ घेऊन मतदार यादीत नाव नोंदणी तसेच आवश्यक दुरुस्ती करून घ्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी विनय गौडा जी. सी. यांनी केले आहे.

जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी श्री. गौडा यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमांतर्गत तयार करण्यात आलेली प्रारूप मतदार यादी दि. 31 ऑगस्ट 2026 रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे. प्रारूप मतदार यादीवर दावे व हरकती दाखल करण्यासाठी दि. 30 सप्टेंबर 2026 पर्यंत मुदत आहे.

मतदार यादीत नाव समाविष्ट नसलेल्या पात्र नागरिकांना नवीन मतदार म्हणून नोंदणी करण्यासाठी नमुना-6 (Form-6) भरता येईल. मतदार यादीतील नोंदीमध्ये दुरुस्ती, स्थलांतर अथवा अन्य आवश्यक बदलांसाठी नमुना-8 (Form-8), तर अपात्र, मृत, दुबार अथवा अन्य कारणांमुळे नाव वगळण्यासाठी नमुना-7 (Form-7) द्वारे अर्ज करता येईल. दि. 1 ऑक्टोबर 2026 रोजी 18 वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक वय पूर्ण करणाऱ्या आणि मतदार यादीत नाव समाविष्ट नसलेल्या पात्र नागरिकांनी मतदार नोंदणी करून घ्यावी. विशेषतः 18 वर्षे पूर्ण करणाऱ्या नवमतदारांनी या मोहिमेत मोठ्या संख्येने सहभागी व्हावे. जिल्ह्यातील सर्व मतदान केंद्रांवर दि. 19, 20, 26 व 27 सप्टेंबर रोजी सकाळी 10 ते सायंकाळी 6 या वेळेत विशेष शिबिरे आयोजित करण्यात येणार आहेत. या शिबिरांमध्ये मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांमार्फत मतदार नोंदणी, दुरुस्ती तसेच नाव वगळण्यासंदर्भातील अर्ज स्वीकारण्यात येतील.

ज्या पात्र नागरिकांची नावे मतदार यादीत नाहीत अथवा ज्यांना मतदार यादीतील नोंदीमध्ये दुरुस्ती करावयाची आहे, त्यांनी संबंधित मतदान केंद्रावरील विशेष शिबिरास भेट देऊन विहित मुदतीत अर्ज सादर करावेत. कोणताही पात्र मतदार मतदार यादीत नाव नोंदविण्यापासून वंचित राहू नये, यासाठी नागरिकांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी विनय गौडा जी. सी. यांनी केले आहे.

# जाळीचा देव ते सावळदबारा व कालिका देवी मंदिरा च्या कामासाठी वन मंत्रींच्या दालनात बैठक, प्रस्ताव तात्काळ मार्गी लावण्याचे आदेश

सोयगाव,दि.१३ सप्टेंबर : अल्पसंख्यांक मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष इद्रीस मुलतानी यांच्या मागणी नुसार सोयगाव तालुक्यातील जाळीचादेव ते सावळदबारा व टिटवी ते कालिकादेवी मंदिर रस्ता व तसेच कलिका देवी मंदिरासाठी वन विभागाचा निसर्ग पर्यटन योजनेअंतर्गत दहा कोटी रुपयांचा निधी संदर्भात आज राज्याचे वनमंत्री गणेशजी नाईक यांच्या दालनात त्यांच्या अध्यक्षते खाली बैठक संपन्न झाली. यावेळी अल्पसंख्यांक मोर्चाच्या प्रदेशाध्यक्ष इद्रिस मुलतानी मुख्य वनरक्षक नागपूर गजेंद्र रामगावकर, उपसचिव निकिता पांडे, वन संरक्षण प्रमोदचंद्र लाखडा, छत्रपती संभाजी नगर उपवन संरक्षण सुवर्णा माने, सभापती पंचायत समिती सोयगाव उत्तम चव्हाण नगरसेवक मुनावर पटेल यांच्यासह वन विभागाचे



अधिकारी उपस्थित होते.

बैठकीमध्ये वनमंत्री गणेश जी नाईक यांनी वन विभागाचे अधिकारी यांना सूचना देत जाळीचा देव ते सावळदबारा-टिटवी ते कालिकादेवी रस्ता हा करणे अत्यंत महत्त्वाचा आहे त्यामुळे वनविभागाने रस्त्यासाठी जागा देणे बाबतचा प्रस्ताव तत्काळ शासनास सादर करण्याचे आदेश मंत्री गणेशजी नाईक यांनी दिले. तसेच कालिकादेवी मंदिर हे वन विभागात असल्यामुळे त्वरित इको टुरिजम अंतर्गत १० कोटी चा विकास कामाचा प्रस्ताव शासनास सादर करण्याचे आदेश मा.मंत्री यांनी सूचना दिल्या व हे तिन्ही विषय मार्गे लावून देण्याचे आश्वासन दिले. या तिन्ही विषयाला मंजुरी मिळाली तर सावळदबारा परिसरततील 12 गावांना याचा मोठा फायदा होणार असून जाळीचादेव ते सावळदबारा रस्ता झाल्यास या भागातील उद्योग व व्यवसाय, रोजगार मध्ये मोठ्या प्रमाणात फायदा होऊन दळणवळण सोयीस्कर होणार आहे तसेच कालिका देवी मंदिर ला रोज हजारो भाविक येतात त्या ठिकाणी पुरेशी सुविधा उपलब्ध नसल्याने भाविकांना त्रास सहन करावे लागतात त्यामुळे १० कोटी निधी उपलब्ध करून दिल्यास मोठा फायदा होईल

यावेळी जयप्रकाश चव्हाण, गणेश लोखंडे, मनोज बुढाळ, अज्ञानसिंग राठोड, प्रमोद पाटील ज्ञानेश्वर राठोड, संभाजी पवार, संजय चव्हाण, प्रकाश अन्वेकर, डॉअरुण पोफळे, शत्रुघ्न दोडे ज्ञानेश्वर अक्कर, राजेश चंडोल,

जाळीचादेव ते सावळदबारा व कालिकादेवी ते टिटवी रस्ता व कालिका देवी च्या विकास कामासाठी 10 कोटी रुपये देण्याचे व शासन कुण ब वर्ग देण्या साठी विविध नाहरकत देणे चे आदेश मंत्री गणेशजी नाईक यांनी दिल्यामुळे या भागाचा विकास होईल. असे इद्रीस मुलतानी यांनी यावेळी म्हटले आहे.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक , प्रकाशक व संपादक – श्री. रशपालसिंघ एन.अट्टल यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४५, सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर सिडको, औरंगाबाद ४३१००५ (महा.) येथे छापून कार्यालय : शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन– ७ पोलीस स्टेशन जवळ, सिडको , औरंगाबाद ४३१००३, (महा.) येथे प्रसिध्द केले. या अंकातील मजकुराशी संपादक जबाबदार राहतीलच असे नाही ( यासंबधी कोणताही वाद औरंगाबाद न्यायालयात राहील.) मो. ७५८८१६६४९६, ९६२३४८४४८४. email : attalmat@gmail.com. RNI.No. MAHMAR/2007/21199